## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ५०४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०७/२०१७

**१) घरात प्रवेश करुन महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ११/०७/२०१७ चे १४.०० वा. दर. यातील फिर्यादी ही आपले वहीनी सोबत घराचे हॉल मध्ये लेटली असतांना यातील आरोपी हा मोटार सायकलने येवुन घरात प्रवेश करुन फिर्यादीचे हात पकडुन हाताने छाती दाबुन विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३५४(अ)(१) ४५२ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जटाळ पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) रेल्वे लाईन उपरी उपस्कर कॉपर तारची चोरी . :—**

दिनांक ११/०७/२०१७ चे ०३.०० वा. दर. यातील आयुध फॅक्टरी सायडिंग भंडारा क्र. १०८१/ओएफ९—१० चे बेला गाव शिवारातील रेल्वे लाईन उपरी उपस्कर कॉपर तार लांबी २० मिटर लांब कॉपर तार अंदाजे वजन अंदाजे २० किलो किंमती ३,०००/—रु. चा कोणीरती अज्ञात चोराने कापुन चोरुन नेल्याने फिर्यादी श्री. समीर कुमार विजयराव मोदक वय ५८ वर्ष, रा. तुमसर (अनुभाग अभियंता उपरी उपस्कर तुमसर रोड यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. आतराम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) समरर्शिबल पंपची चोरी . :—**

दिनांक १०/०६/२०१७ चे ०९/०७/२०१७ चे १३.१५ वा. दर. यातील एम. एम. पी कंपनीचे कम्पाउंट वॉलला लागुन आत मध्ये कंपनीत पाणी पुरविण्याकरीता लावलेली एक किर्लोस्कर कंपनीची समरर्शिबल पंप १.५ एचपी ची अंदाजे किंमती १५,९५२/—रु. ची कोणीरती अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी धनराज बळीराम वैदय वय ४८ वर्ष, रा. शहापुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन लोखंडी पेटीतुन सोन्याचे दागीणे व एटीएम कार्ड व्दारे पैश्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०५/०७/२०१७ चे १६.००ते ११/०७/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील फिर्यादी अनिल मनिराम कुलपे वय ४५ वर्ष, रा. एमएसीबी कॉलोनी राजगोपालचारी वार्ड भंडारा याने आपले घराला ताला लावुन कुंटुबासह बाहेरगावी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन घरात ठेवलेली लोखंडी पेटी मधील सोन्याचे कानातील झुमके ७ ग्रॅम, सोन्याची गहु मण्याची गाठी ६ ग्रॅम, सोन्याची पाणे असलेली पट्टी ७ ग्रॅम, सोन्याची नथ ३ ग्रॅम, युनियन बॅक ऑफ इंडीयाचे खातेमधुन एटीएम कार्ड व्दारे २१,०००/—रु. काढुन असा एकुण ६१,५००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवि. सहकलम १८४,१९४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास सपोनि. किचक पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) पोल्ट्री फार्मची लोखंडी जाडी तोडुन पंखे, बल्प व औषधी फवारणी पंपाची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०८/०७/२०१७ चे १०.०० वा. दर. यातील फिर्यादी पोल्ट्री फार्मची लोखंडी जाडी तोडुन आत मध्ये लावलेले २ आशा कंपनीचे पंखे व ५ आरीयंट कंपनीचे किंमती ३,०००/—रु. चे दिसले नाही तसेच खरडयाचे खोक्यात ठेवलेले २०० व्हॅटचे चायना व फिलीप्स कंपनीचे २४ बल्प किंमती ५००/—रु. व १ औषधी फवारणी पंप किंमती १,०००/—रु. असा एकुण अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी मंगेश शंभु काशिवार वय ३८ वर्ष, रा. इंजेवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोहवा. सेलोकर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**६) गळयातील मंगळसुत्र खाली पडुन अज्ञात चोराने चोरुन नेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ११/०७/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील फिर्यादी सौ. स्वाती धराज धर्मशहारे वय २६ वर्ष, रा. समर्थ नगर मुरमाडी ही आठवडी बाजार करण्यास गेली असता बाजार करीत असतांनी तिचे गळयातील १ सोन्याचा मंगळसुत्र ३ तोडे किंमती ४५,०००/—रु. चा नकळत गळयातुन खाली पडला तो मंगळसुत्र कोणीरती अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**७) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल स्लीप होवुन डोक्याला गंभिर मार लागुन औषधोपचारा दरम्यान स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २०/०६/२०१७ चे २०.३० ते २८/०६/२०१७ चे २३.०० वा. दर. यातील आरोपी मृतक आकाश रंगलाल पटले वय २० वर्ष, रा. झारली हा आपल्या ताब्यातील मोटार सायकल ने झारली गावा वरुन शेतात जात असतांना मोटार भरधाव वेगाने व हयगयीने व निष्काळजीपणे चालुवन मोटार सायकल स्लीप होवुन खाली पडल्याने त्याचे डोक्याला गंभिर मार लागुन त्याचा सु. बो दवाखाना तुमसर येथे प्राथमीक उपचार करुन पुढील उपचारास मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचार दरम्यान मरण पावल्याने व सदर मृतक आरोपी हा स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र.००/१७ कलम १७४ जाफौ. कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. ठवरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोहवा. कळंबे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**८) अल्पवयीन दोन्ही मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १०/०७/२०१७ चे १८.३० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १२ वर्ष, ही शेजारी राहणारी अल्पवयीन मुलगी वय १४ वर्ष, हिचे सोबत घरी कोणाला न सांगता निघुन गेली सर्व ठिकाणी शोध घेतला असता मिळुन आल्या नाही शासन परिपत्रका अन्वये व अल्पवयीन दोन्ही मुलींना कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले असावे असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोहवा. शेंडे पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**९) अवैध दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक ११/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, करडी, लाखनी, लाखांदुर व दिघोरी येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ७० लिटर हातभट्टी दारु + १२० किलो सडवा + साहित्य कि.११०६०/—रु. व ८६३ लिटर ६४० मि.ली. देशी दारु/विदेशी + १ टाटा सुमो + १ मोबाईल + १ मोटार सायकल किमती. ५,३७,६४०/रु. असा एकुण किमती ५,४८,७००/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

सपोनी. पी. के. बोरकुटे
पोलीस नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.९६५७४०७१७३

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.